महासागर अमरावती
रविवार, दि. 30 मार्च 2025
पान 3

वोकाट्राइब प्रायव्हेट लिमिटेड कंपनी अमरावती ला हॉस्पिटलमध्ये कामासाठी मेगा भरती सुरू आहे
वार्ड बॉय -150 , जीएनएम नर्सिंग -100 , हाऊस कीपिंग-90 ही पदे भरती सुरू आहे.
संपर्क 07620610131 09623316598 08305146500
8 तास ड्युटी राहील
पगार 10,000-15000
संपर्काची वेळ
सकाळी 10 ते संध्याकाळी 5 पर्यंत.

## घरात जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न

**अमरावती** - पैशाच्या व्यवहारावरून एका महिलेच्या घरात घुसून तिच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. ही घटना 23 मार्च रोजी रात्री 11 वाजता फ्रेजरपुरा पोलिस स्टेशन परिसरात घडली. या घटनेची तक्रार महिलेने 28 मार्च रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी अविनाश लव्हाळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# खरीप हंगामात कपाशीचे दोन कोटी पॅकेट्स लागणार

### इतर पिकांचे दर पडले : बियाणे विक्रेत्यांनी नोंदविली मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.29 )-** खरीप हंगामात संपूर्ण विदर्भामध्ये लागवडीचे चित्र बदलण्याची शक्यता आहे. खुल्या बाजारात कापूस वगळता इतर सर्व पिकांचे दर कोलमडले आहे. किमान आधारभूत किमतीमध्ये सरकार कापूस खरेदी करेल या विश्वासावर शेतकरी कापसाची लागवड करण्याची शक्यता आहे. यातूनच बियाणे विक्रेत्यांनी गुढीपाडव्याच्या पर्वावर दोन कोटी पॅकेटस् (प्रत्येकी 475 ग्रॅम) कपाशी बियाण्यांची मागणी नोंदविली आहे. खरीप हंगामाला वेळ असला तरी बियाण्यांची नोंदणी तीन ते चार महिने आधीच करावी लागते. त्या दृष्टीने बियाणे निर्मिती करणाऱ्या कंपन्या



बाजारपेठेतून मागणी नोंदवत आहे. त्यानुसार कंपन्या धोरणही ठरवीत आहे. सध्या याच पद्धतीने येणाऱ्या काळात कुठल्या बियाण्यांची मागणी अधिक राहील यानुसार नोंदणी केली जात आहे.

### मक्याचे क्षेत्र वाढणार

विदर्भात मका लागवड होत नसला तरी याचे उत्पादन अधिक होत असल्याने शेतकरी मका लागवडीकडे वळण्याची शक्यता आहे. यातून मक्याच्या बियाण्यांची मागणी विक्रेत्यांकडून नोंदविली जात आहे. एक नवे पीक विदर्भात पाहायला मिळणार आहे. याशिवाय इथेनॉल निर्मितीसाठी मक्याची मागणी होत असल्याने याला चांगला दर राहण्याची शक्यता आहे. संरक्षणाच्या दृष्टीने शेतकऱ्यांना मोठी व्यवस्था करावी लागणार आहे.

### तुरीचे क्षेत्र वाढेल; सोयाबीनचे मात्र घटेल

येणाऱ्या हंगामात तूर लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल राहणार आहे. त्या दृष्टीने आंतरपीक म्हणून शेतकरी तुरीच्या बियाण्यांची मागणी मोठ्या प्रमाणात करीत आहेत. दुसरीकडे सोयाबीनचे दर कमालीचे घसरले आहेत. यामुळे येणाऱ्या हंगामात सोयाबीनचा पेरा 15 ते 20 टक्क्याने कमी होण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

### कापूस उत्पादक प्रांतावर विक्रेत्यांच्या नजरा

- संपूर्ण राज्यात 330 कंपन्या बियाण्यांची विक्री करतील. सुमारे दोन कोटी पॅकेटस् बियाणे लागतील. त्यानुसार याची नोंदही करण्यात येत आहे. कापूस उत्पादक प्रांत म्हणून विदर्भाकडे पाहिले जाते.
- या ठिकाणी कापसाचा पेरा मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये 15 ते 20 टक्के क्षेत्र कापसाखाली अधिक येण्याची शक्यता नियोजन विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. त्यानुसार कंपन्यांकडे बियाण्याची नोंदणी केली जात आहे.

# शेतातील झोपडीतून साहित्य चोरणाऱ्याला अटक

### बडनेरा आणि खोलापुरीगेट पोलिसांची संयुक्त कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 29 ) –** अकोली ते पिंपरी रस्त्यावरील शेतात बांधलेल्या झोपडीतून साहित्य चोरी करणार्या एका आरोपीला बडनेरा आणि खोलापुरी गेट पोलिसांनी संयुक्त कारवाईत अटक केली. अटक केलेल्या आरोपीचे नाव अभिषेक उर्फ रोहित देवानंद गवई (20, रा. पिंपरी यादगिरे) असे आहे.

साई नगर स्थित चंदन नगर येथील रहिवासी अशोक यादव यांचे अकोली ते पिंपरी रस्त्यावर एक शेत आहे. त्यांनी शेतात बांधलेल्या झोपडीत पाण्याचे यंत्र, अँगल ग्राइंडर तसेच तूर आणि सोयाबीन असे साहित्य व धान्य ठेवले होती. दरम्यान अज्ञात आरोपींनी झोपडीतून एकूण 44 हजार रुपयांचा माल चोरून नेला. याबाबत बडनेरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. बडनेरा



आणि खोलापुरीगेट पोलिसांनी संयुक्त कारवाई करत आरोपी अभिषेक गवई याला अटक केली. अभिषेकला बडनेरा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. बडनेरा पोलिस पुढील कारवाई करत आहेत.

# छायाचित्रकाराला मारहाण करून लुटले

### कॅमेरा, लाईट आणि लेन्स चोरले

### घातखेडा रस्त्यावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, दि. 29)** फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील घातखेडा रोडवर एका छायाचित्रकारावर हल्ला करून त्याचा कॅमेरा, लेन्स आणि लाईट्स लुटल्याची घटना घडली. चोराने छायाचित्रकार जवळील 2 लाख 60 हजाराचे साहित्य चोरून नेले आहे. या या घटनेची तक्रार 28 मार्च रोजी वेदांत गिरीश मानमोडे (19, रा. बुधवारा, अंबागेट, अमरावती) यांनी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी पाच ते सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार, वेदांत मानमोडे हे व्हिडिओ शूटिंगचे काम करतात. ते त्यांचा मित्र संस्कार कुमुद साहू (19) याच्यासोबत रील बनवण्याचे सुध्दा काम करतात. 28 मार्च रोजी दुपारी 1.30 वाजता संस्कारने फोन करून सांगितले की त्याला दुपारी 4 वाजता घातखेडा गावात शूटिंगसाठी जायचे आहे. त्यानंतर दोघेही एमएच 27 सीजे 7647 या क्रमांकाच्या दुचाकीने घातखेडा येथे निघाले. वेदांत गाडी चालवत होता आणि संस्कार मागे कॅमेरा बॅग धरून बसला होता. दरम्यान डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेजकडे जात असताना, मागून 4 दुचाकीवर पाच ते सहा जण आले. त्यानंतर त्यांनी वेदांतच्या गाडीला पल्सर मागून धडक दिली. ज्यामुळे वेदांत आणि संस्कृत खाली पडले. त्यानंतर आरोपीने चाकू काढला आणि संस्कारच्या डोक्यावर आणि गालावर वार केले. ज्यामुळे तो जखमी झाला. त्यानंतर त्यांनी त्याच्याकडून कॅमेरा बॅग हिसकावून घेतली आणि सर्वांनी अमरावतीकडे पळ काढला. सर्व तरुणांनी आपले चेहरे दुप्पट्याने बांधले होते. त्याच्या बॅगेत 2 लाख रुपये किमंतीचा कॅमेरा, 50 हजार रुपये किमंतीचा लेन्स आणि 10 हजार रुपये किमतीचा लाईट, असे एकूण 2 लाख 60 हजार रुपयांचे साहित्य चोरी गेले.

# विधी संघर्षीत बालकासह पाच जणांनी केली बॅग लिफ्टिंग

### गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 ची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 29)** दिवसाढवळ्या जबरी चोरी प्रकरणात विधी संघर्षीत बालकासह पाच जणांचा समावेश असल्याची माहिती उघडकीस आली. पोलिसांनी या गुन्ह्याचा 24 तासांत छडा लावून एका विधी संघर्षीत बालकाला ताब्यात घेतलेले आहे.

पोलिस सुत्रानुसार, 27 मार्च रोजी मंगेश वासुदेव काळे (26, रा. पवननगर, अमरावती) हे दुकानातील 2 लाख 75 ह जार 320 रुपये बॅगमध्ये घेवून प्रीया टॉकीनकडून राजकमलकडे जात होते. दरम्यन सायंकाळी 5.30 ते 6.15 वाजताच्या दरम्यान एका अज्ञात इसमाने मंगेशला अडविले. त्यानंतर त्याने आपल्या आणखी इतर दोन साथीदारांचे मदतीने मंगेशजवळील बॅग जबरीने हिसकावून दुचाकीवर पळ काढला. या घटनेच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला होता. सदरचे



गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलिस अधिकार्यांनी तात्काळ घटनास्थळास भेट दिली तसेच पोलीस आयुक्त यांनी बैठक घेवून मार्गदर्शन केले. सदर गुन्हा उघड करण्याकरीता पोलिस आयुक्तांनी आदेशीत केले होते. या गुन्ह्यात गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी भेट देवून परिसरातील सि.सि.टी.व्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. त्यानंतर फुटेज व गुप्त माहितीवरून पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेले दुचाकी वाहन व आरोपींची ओळख पटविली. त्यानंतर पोलिसांनी एका विधि संघर्षीत बालकांस ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेले वाहन ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याला विश्वासात घेवून विचारपूस केली असता सदरचा गुन्हा त्याने त्याचे साथीदार छोटू उर्फ सोहेल शहा शफीक शहा (रा.कबीरनगर, सरकारी दवाखान्याजवळ, अमरावती), अहमद खाँ नूर खाँ (रा.कबीरनगर, सरकारी दवाखान्याजवळ, अमरावती), फैजान उर्फ गिल्ला वल्द फिरोज खान (रा. साजीया नगर, अमरावती), रिझवान (रा. रहेमत नगर, अमरावती), दादू वल्द नसीम (रा. साजिया नगर, अमरावती) यांनी मिळून केल्याचे निदर्शनास आले. चौकशीदरम्यान माहिती पडले की, त्यांनी शेख सरफराज शेख सिराज (रा. छअसाल नगर) याच्या घरी जावून जबरी चोरी केलेल्या पैशाचे वाटप केले. पुढील तपासकामी विधिसंघर्षग्रस्त बालकांस कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तसेच

### 80 हजाराचा मुद्देमाल जप्त

याप्रकरणात पोलिसांनी एक दुचाकीसह 80 हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, जयदत्त भंवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलिस हवालदार सतीष देशमुख, फिरोज खान, सचिन बहाळे, अलीमउद्दीन खतीब, नाझीमउददीन सैयद, विकास गुडधे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक अलिमोददीन खतीब, अशोक खंगार, किशोर खेंगरे यांनी तसेच सायबरचे एपीआय अनिकेत कासार व पोलिस हवालदार निखील माहूरे यांनी केली आहे.

उर्वरित आरोपी व दुचाकी वाहनाचा कसोशीने शोध सुरु आहे.

# मुख्याध्यापकाने केला शिक्षिकेचा विनयभंग

### बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 29)** बडनेरा हद्दीतील एका शाळेतील मुख्याध्यापकाने महिला शिक्षीकेचा विनयभंग केला. पिडित महिलेच्या तक्रारीरून 27 मार्च रोजी बडनेरा पोलिसांनी आरोपी मुख्याध्यापक संतोषकुमार नायर याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

तक्रारीनुसार, शिक्षिका या दोन वर्षांपासून बडनेरा हद्दीतील एका नामांकित शाळेत कार्यरत आहेत. तेथील मुख्याध्यापक संतोषकुमार हे नेहमी शिक्षिकेचा अचानक हात पकडत होते. 10 ऑगस्ट रोजी संतोषकुमार यांनी शिक्षिकेच्या कक्षात जाऊन त्यांचा हात पकडला होता. शिक्षिकेने विरोध करून, मुख्याध्यापकाला एक थप्पड लगावली होती. परंतू संतोषकुमारने शिक्षिकेला नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी दिली. त्यावेळी शिक्षिकेला शिविगाळ करून संतोषकुमार निघून गेला. शिक्षिकेने हा प्रकार आपल्या पतीला सांगितला. परंतू बदनामीच्या भितीपोटी शिक्षिकेने तक्रार केली नाही. परंतू काही दिवसानंतर संतोषकुमारने शिक्षिकेच्या घरी येतो, असे म्हटले. त्यामुळे शिक्षिकेने पोलिसात तक्रार करण्याबाबत संतोषकुमारला म्हटले होते. त्यानंतर शिक्षिकेने हा प्रकार शाळेतील वरिष्ठ महिला पदाधिकारीला दिली आणि सीसीटीव्ही लावण्याबाबत म्हटले. परंतू त्यांनीही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतरही संतोषकुमारकडून शिक्षिकेला त्रास देणे सुरुच होते. त्यामुळे शिक्षिकेने संतोषकुमारच्या पत्नीला हा प्रकार सांगितला. परंतु त्यांनीही पतीकडून भाग घेत महिला शिक्षिकेशी वाद केला. या प्रकार शाळेतील वरिष्ठांपर्यंत पोहोचला, त्यावेळी शिक्षिकेला राजीनामा देण्यास सांगण्यात आले. त्यामुळे शिक्षिकेने राजीनामा दिला. दरम्यान आता एका महिला शिक्षिका नोटीस कालावधीवर काम करीत आहे. असे शिक्षिकेने पोलिस तक्रारीत म्हटले आहे. यावरून बडनेरा पोलिसांनी मुख्याध्यापक संतोषकुमारविरुध्द गुन्हा नोंदविला.

# वीज देयके भरून थकबाकी केली शून्य

### न हजारो रुपयांच्या व्याजापासून केली बचत ■ ग्रामीण पोलिस अधीक्षकांचा पुढाकार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 29) -** अमरावती जिल्ह्यामध्ये ठिक ठिकाणी ग्रामीण पोलीस कार्यालये आहेत. परंतू योग्य नियोजनाअभावी दरमहा वेगवेगळ्या कार्यालयांची वीज बिल थकबाकी वाढत होती. त्यामुळे अमरावती ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी तत्काळ नियोजन आणि उपाययोजना करून जिल्ह्यातील सर्व ग्रामीण पोलिस कार्यालयाशी संबंधित 42 लाख रूपयांच्या वीज बिलांचा दोन टप्प्यात भरणा केला. त्यामुळे मार्च 25 पर्यंतच्या वीजबिलाची थकबाकी शुन्य झाली आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस कार्यालयाशी संबंधित पोलीस चौकी, ठाणे,अधीक्षक कार्यालय यांना दरमहा 4 ते 5 लाख रूपयाचे वीज बिल येते. परंतू सर्व कार्यालयाचे वीज बिल नियमित आणि एकत्रितरित्या पोलिस अधीक्षक कार्यालयात पोहचत नसल्याने सदर बिले एकत्रितपणे भरण्यामध्ये अडचणी येत होत्या. परिणामी त्याचे रूपांतर 40 लाख रूपयाच्या थकबाकीत झाले. परंतू थकबाकीमुळे विनाकारण विलंब शुल्क आणि व्याज यांचा भुरदंड पडत असल्याचे लक्षात आल्यानंतर ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी त्याची गंभीरतेने दखल घेत अधिनस्त



कार्यालयातील सर्व वीज बिले एकत्रित रित्या भरण्याबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश सूरज बोंडे पोलीस उपअधिक्षक यांना दिले.

त्यानंतर कार्यालय अधीक्षक ज्योती आखरे यांनी कनिष्ठ श्रेणी लिपिक राजेश टेंभुर्णे व पंकज रेलकर यांच्या सहकार्याने जिल्हास्तरावरील बिलांची एकत्रित माहिती महावितरण अमरावती मंडळ कार्यालयाचे उच्चस्तर लिपिक प्रीतेश पाटकर यांच्याकडून व्यवस्थापक वित्त व लेखा विकास बांबल यांच्या मार्गदर्शनात उपलब्ध असलेल्या निधीनुसार तयार करून घेतली. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस स्टेशन, चौकी यांची देयके उपलब्ध असलेल्या निधीनुसार नियमित निघत गेली, मंजूर होऊन त्याचा भरणा होत गेला व त्याचा परिणाम म्हणून मार्च महिना संपण्यापूर्वीच जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस स्टेशन/चौकी/शाखा यांची थकबाकी शून्यावर आल्याने व्याजापोटी भराव्या लागणाऱ्या हजारो रूपयाची बचत झाली.

मार्च महिना आर्थीक वर्षाचा अंतिम महिना असल्याने संपूर्ण वर्षाचा ताळेबंद करण्याचा महिना असल्यामुळे महावितरणचे अधिकारी, अभियंते व कर्मचारी प्रत्येक थकबाकीदार वीज ग्राहकाच्या दारी जात आहेत. पोलिस अधिक्षक विशाल आनंद सिंगोरी (आयपीएस) यांनी जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस कार्यालयाच्या वीज बिलाची थकबाकी शुन्य करण्याकरता घेतलेल्या पुढाकाराबद्दल आणि केलेल्या सत्वर कार्यवाहीबद्दल अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी आभार व्यक्त केले.

# खारतळेगाव शेतशिवारात आग

### अनेक महाकाय वृक्ष स्वाहा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 29 ) -** अमरावती मार्गावरील खारतळेगाव शेतशिवारात (दि.28) रात्रीच्या वेळी धुरे साफ करण्यासाठी लावण्यात आलेल्या आगीत अनेक महाकाय वृक्ष जळून खाक झाले. यामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकर्यांनी धुरे साफ करण्याच्या उद्देशाने शेतात आग लावली होती. मात्र योग्य देखरेख न केल्यामुळे ही आग आटोक्यात न राहता मोठ्या प्रमाणात पसरली. परिणामी, अनेक महाकाय वृक्ष आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या



घटनेमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धूर पसरला होता. अशा वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. या आगीत अनेक महत्त्वपूर्ण वृक्ष नष्ट झाले आहेत, ज्यामुळे पर्यावरणीय संतुलनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी शेतातील धुरे साफ करताना अधिक काळजी घेण्याची आवश्यकता आहे. दरम्यान या प्रकाराची नोंद प्रशासनाने घेतली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# लागोपाठ रेल्वे अपघाताच्या घटनांमूळे

## धामणगाव रेल्वे स्थानकांवरील सुरक्षा उपाययोजना चर्चेत

**सलील काळे**

**धामणगाव रेल्वे,( दि.29 )** - भारतीय रेल्वेच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे, धामणगाव रेल्वे स्टेशनवर गेल्या तीन दिवसांत घडलेल्या तीन दुर्दैवी घटनांनंतर विशेषत्वाने. या घटनांमुळे रेल्वे प्रशासनाच्या सुरक्षा उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, येथील अपुऱ्या सुविधा आणि संवेदनशीलतेचा अभाव याकडे लक्ष वेधले गेले आहे. रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ), रेल्वे प्रशासन आणि स्थानिक पोलिस यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे या घटना घडल्याचे मत तज्ञांकडून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर, रेल्वे सुरक्षा उपाययोजनांचा आढावा घेणे आवश्यक ठरते. रेल्वे सुरक्षा बलाची भूमिका रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) हे भारतीय रेल्वेच्या सुरक्षेचे प्रमुख अंग मानल्या जाते. 1985 मध्ये स्थापन झालेल्या या बलाला रेल्वे मालमत्तेचे संरक्षण आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आरपीएफ ला रेल्वे कायदा, 1989 अंतर्गत शोध, अटक आणि तपासाचे अधिकार आहेत. धामणगावातील घटनांमध्ये ऋक्ष्न ची उपस्थिती असूनही, बडनेरा रेल्वे पोलिसांच्या उशिरा आगमनामुळे परिस्थिती हाताबाहेर गेली. यामुळे स्थानिक पोलिस आणि आरपीएफ यांच्यातील ताळमेळ वाढवण्याची गरज अधोरेखित झाली आहे. धामणगावातील घटनांनी रेल्वे सुरक्षा उपाययोजनांमध्ये सुधारणांची गरज अधोरेखित केली आहे. रेल्वे प्रशासनाने तंत्रज्ञानाचा वापर आणि कर्मचारी प्रशिक्षण यावर भर देत असले तरी, स्थानिक पातळीवर कार्यक्षमता आणि संवेदनशीलता वाढवणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रशासन, आरपीएफ आणि स्थानिक नागरिक यांच्यातील सहकार्य मजबूत करणे ही काळाची गरज आहे. या घटनांमधून धडा घेऊन रेल्वे प्रशासनाने तात्काळ पावले उचलली, तरच भविष्यातील दुर्घटना टाळता येतील.




### आरपीएफ आणि जीआरपी मधील फरक

रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) आणि सरकारी रेल्वे पोलिस (जीआरपी) यांच्यातील मूलभूत फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. आरपीएफ हे केंद्रीय सशस्त्र पोलिस दल असून, त्यांचे प्राथमिक कार्य रेल्वेच्या मालमत्तेचे संरक्षण आणि रेल्वे परिसरातील सुरक्षितता सुनिश्चित करणे आहे. याउलट, तत्रक्क हे राज्य सरकारच्या पोलिस दलाचा भाग असून, रेल्वे परिसरात घडणाऱ्या गुन्ह्यांचा तपास आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. उदाहरणार्थ, एखाद्या दुर्घटनेत चोरी किंवा हत्या झाल्यास आरपीएफ तपास करते, तर आरपीएफ स्टेशन आणि गाड्यांच्या सुरक्षेवर लक्ष केंद्रित करते. धामणगावात रेल्वे स्थानकावर झालेल्या घटनांमुळे जीआरपी चा विलंब आणि आरपीएफचा हलगर्जीपणा तसेच दोन्ही यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव उघड झाला आहे.

### रेल्वेने सुरक्षेसाठी उचलली पावले आहेत

- **कवच सिस्टीम :** रेल्वे गाड्यांच्या टक्कर टाळण्यासाठी स्वयंचलित संरक्षण प्रणाली लागू करण्यात आली आहे. ही यंत्रणा सिग्नलिंग त्रुटी आणि मानवी चूक यांचा धोका कमी करते.
- **इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग :** रेल्वे ट्रॅक आणि सिग्नल यांचे व्यवस्थापन सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे.
- **फॉग सेफ्टी डिव्हाइस :** धुक्याच्या काळात दृश्यमानता कमी झाल्यास चालकांना मदत करण्यासाठी ही उपकरणे बसवली आहेत.
- **राष्ट्रीय रेल संरक्षा कोष :** रेल्वे सुरक्षा उपायांसाठी विशेष निधी उपलब्ध करून पूल, ट्रॅक आणि स्टेशन सुधारणांवर भर दिला जात आहे.
- **सुरक्षा हेल्पलाइन :** प्रवाशांसाठी 182 ही टोल-फ्री क्रमांकाची सुविधा उपलब्ध आहे, ज्याद्वारे तात्काळ मदत मिळू शकते.

### धामणगावातील घटनांमुळे उघड झालेल्या सुविधांची उणिव


- **अपुऱ्या सुविधा:** स्टेशनवर पिण्याच्या पाण्याची कमतरता आणि सुरक्षित चढ-उतारासाठी अपुरे कर्मचारी यामुळे प्रवासी धोक्यात येत आहेत.
- **पोलिसांचा विलंब :** बडनेरा रेल्वे पोलिसांना घटनास्थळी पोहोचण्यास सहा तास लागणे हे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे द्योतक आहे.
- **सुरक्षा कर्मचाऱ्यांची कमतरता :** स्टेशनवर आरपीएफ कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याने तात्काळ कारवाईत अडथळा येतो.

### या उपाययोजना करणे आवश्यक

- **स्टेशन सुधारणा-** पाण्यासारख्या मूलभूत सुविधा वाढवणे आणि प्लॅटफॉर्मवर सुरक्षितता सुनिश्चित करणे. ऋक्ष्न ची संख्या वाढवणे- व्यस्त स्टेशनांवर सुरक्षा कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून तात्काळ प्रतिसाद सुनिश्चित करणे.
- **पोलिस समन्वय-** स्थानिक आणि रेल्वे पोलिस यांच्यातील समन्वय सुधारण्यासाठी संयुक्त प्रशिक्षण आणि संवाद वाढवणे.
- **प्रवासी जागरूकता-** धावत्या गाडीत चढणे-उतरने टाळणे, ट्रॅक ओलांडण्याऐवजी फूट ओव्हरब्रिजचा वापर करणे याबाबत जागरूकता मोहीम राबवणे.
- **तात्काळ प्रतिसाद यंत्रणा-** दुर्घटनेनंतर मृतदेहाची विटंबना टाळण्यासाठी शवविच्छेदनगृहात त्वरित हस्तांतरणाची व्यवस्था करणे.

# जुळ्या शहरात अल्पवयीनांची गुन्हेगारी प्रवृत्ती वाढली

## युवकाच्या हल्ल्यात दोन अल्पवयीन जखमी



**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर,( दि.29 )-** अचलपूर पोलीस स्टेशन हद्दीतील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वार समोर चार ते पाच युवकांनी दोन अल्पवयीन मुलांवर चाकुने हल्ला केल्याची घटना गुरुवार रात्री 8 च्या सुमारास घडली. हा हल्ला चार ते पाच आरोपी मधून एका आरोपीला एका दाल मिल मध्ये चोरी केल्याची माहिती त्या जखमी अल्पवयीन मुलाने मिल मालकाला दिल्याच्या रागावरून ही घटना घडल्याची माहिती समोर आलेली आहे. यामध्ये एका अल्पवयीन मुलावर चाकूने पाठीवर हल्ला केल्याने त्याला खाजगी रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले आहे. या प्रकरणाची अचलपूर पोलीस स्टेशन मध्ये वृत्त लीहेपर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. संशयित आरोपींना अचलपूर पोलीस स्टेशन विभागाने अटक करून पुढील चौकशी सुरू आहे. 27 मार्च रोजी अचलपूर पोलीस स्टेशन हद्दीतील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वार समोर दोन अल्पवयीन मुलांवर 8 ते 10 जणांच्या टोळक्याने हल्ला केल्याची घटना घडलेली आहे. यासंदर्भात अचलपूर पोलीस स्टेशन मधून मिळालेल्या माहितीनुसार, 27 मार्च रोजी एका दाल मिल मध्ये आरोपी पैकी एका जणांचे नाव त्या जखमी अल्पवयीन मुलाने मिल मालकाला सांगितले होते. यानंतर मिल मालकाने त्या चोरी करणाऱ्या युवकाला समज देऊन सोडून दिले. मात्र याचा राग मनात धरून त्या आरोपीने जखमी अल्पवयीन मुलाला अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वार समोर बोलविले, यावेळी आरोपी चार ते पाच जण तेथे हजर होते. यानंतर बाचाबाचीत रूपांतर होऊन हाणामारी झाली. आरोपीने आपल्या साथीदारासह त्या अल्पवयीन मुलाच्या पाठीवर चाकूने हल्ला केला. सोबत असलेल्या दुसरा अल्पवयीनहीं जखमी झाला. घटनेची माहिती जुळ्या शहरात वाऱ्यासारखी पसरली. यानंतर अचलपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन मेहत्रे यांनी याची तात्काळ दखल घेत संशयित आरोपींना चौकशी ताब्यात घेतले असून पुढील चौकशी सुरू आहे. यातील 4 आरोपी सज्ञान तर 1 आरोपी हा अल्पवयीन असुन रवीनगर परतवाडा व फॉरेस्ट कॉलनी परतवाडा येथील आहे फिर्यादी नरसाळा (ता.अचलपूर) येथील आहे.

# अखेर प्रभाकर झोड यांचे उपोषण मागे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )** - अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेच्या संचालक मंडळा विरोधात तातडीने कार्यवाही करावी, दि. 3 मार्च 2025 रोजी उपविधी संदर्भात चुकीच्या पद्धतीने जारी केलेला आदेश तातडीने रद्द करावा, खरेदी आणि इतर निविदा प्रक्रिया संदर्भात शासकीय ऑडिट करावे, नोकर भरती संदर्भात न्यायालयात प्रलंबित याचिकेच्या निर्णयानुसार कार्यवाही करावी, यासह एकूण अकरा मागण्यासाठी गेल्या तीन दिवसापासून विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कांतानगर, अमरावती यांचे कार्यालय समोर शिक्षक बँक विकास आघाडीच्या वतीने माजी संचालक प्रभाकर झोड आमरण उपोषणाला बसलेले होते. आज उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांचे निर्देशानुसार अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांना जनता दरबारामध्ये आंदोलनकर्त्यांनी निवेदन देऊन चर्चा केली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे याचे हस्तक्षेपानंतर विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी मागण्या मान्य केल्याचे लिखित पत्र देत असल्याबाबत आश्वासित केले. यानंतर अवघ्या काही मिनिटांमध्ये विभागीय उपनिबंधक चैतन्य नासरे, जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी लिखित पत्र उपोषणकर्त्यांना सादर केले. त्यानंतर आमदार प्रवीण तायडे यांनी उपोषण स्थळी जाऊन प्रभाकर झोड यांना ज्यूस देऊन त्यांचे उपोषण सोडविले.



# या.द.व. देशमुख महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा,( दि.29 )** - या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य विद्याशाखा, इंग्रजी विभाग व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आर्थिक साक्षरता कार्यक्रम (दि.28)संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख होते तर प्रमुख अतिथी आर्थिक साक्षरता केंद्र जनजागृती अभियान मोर्शी येथील सहयोगी छाया भिसेकर ह्या होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून शुभांगी चिंचोलकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी छाया भिसेकर यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात होणाऱ्या महागाईवर आणि आर्थिक अडचणीवर प्रकाश टाकत भविष्यासाठी आर्थिक सक्षम होण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या उपायाबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आजपासूनच गुंतवणूक करण्याचे आवाहन केले जेणेकरून भविष्यात येणाऱ्या आर्थिक अडचणीवर सहज मात कशी करता येईल. विद्यार्थ्यांनी सर्व माहिती अवगत करून गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात नियमित येऊन ज्ञानार्जन करून प्रत्येकाने आर्थिक साक्षरता ज्ञान आणि माहिती संग्रहित करावी असे सांगितले. महाविद्यालयामधील सांस्कृतिक समन्वयक डॉ. प्रशांत हरमकर यांनी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कलागुणांबद्दल माहिती सांगून त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाचे संचालन इतिहास विभाग प्रमुख डॉ.सोनटक्के यांनी केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. चरणदास सोळंके, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. श्याम गेडाम, ग्रंथालय विभागप्रमुख प्रा. रविंद्र पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.गणेश खेकाळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा. सारीपुत्र भालेकर, प्रा. सुमित मेश्राम प्रा. पाणबुडे प्रा. सोनवणे प्रा.गणवीर, विद्यार्थी प्रतिनिधी सम्यक तेलमोरे व विद्यार्थिनी प्रतिनिधी अंजली नायसे आदी उपस्थित होते.





# उदखेड येथे मिशन पटसंख्या वाढ अंतर्गत प्रभातफेरी

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, ( दि.29 )**–पटसंख्या वाढ मोहीम अंतर्गत जि.प. प्राथमिक शाळा उदखेड येथे कुटुंब सर्वेक्षण व प्रभात फेरी तसेच पटसंख्या वाढीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन (दि.29) करण्यात आले. प्रसंगी गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. इयत्ता पहिली मध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्याच्या घरी भेट देऊन त्यांना इयत्ता 1 ली मध्ये प्रवेश करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात आले. शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्वागत करण्यात आले. या उपक्रमात उदखेड सरपंच शैलजा खंडार , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा वनिता सोळंके, ग्रा.पं. सदस्य प्रकाश भोयर, प्रिती भांगे, शिक्षक वृंद, अंगणवाडी कर्मचारी सहभागी झाले होते.

# क्रीडा स्पर्धेत निवासी मतिमंद विद्यालय सुरवाडीची उंच भरारी

## 2 सुवर्ण पदकासह पटकाविले रजत पदक, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा,( दि.29 )** - दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे, क्रीडा संचालनालय स्व. प्रभाकरराव दटके स्मृती संस्था नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित दिव्यांग मुला-मुलींच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा दि. 21 ते 23 मार्च दरम्यान नागपूर येथील रेशिमबाग प्रांगणात आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये निवासी मतिमंद विद्यालय सुरवाडी तिवसा येथील विद्यार्थ्यांनी मतिमंद प्रवर्ग मध्ये अनुक्रमे मनोज जग्गू उईके 100 मीटर व 200 मीटर धावणे मध्ये 2 सुवर्ण, अमृता शेंद्रे 100 मी. धावणे मध्ये 1 रजत, लक्ष्मी मौजे 50 मी. धावणे मध्ये 1 कांस्य पदक आणि बहुविकलांग प्रवर्ग मध्ये प्रणव शिरभाते बादलीत बॉल टाकणे स्पर्धेमध्ये 1 सुवर्ण , 25 मी. चालणे मध्ये 1 रजत पदक प्राप्त केले. गौरवाची बाब म्हणजे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते निवासी मतिमंद विद्यालय सुरवाडी तिवसा येथील विद्यार्थिनी अमृता शेंद्रे ला 100 मी. धावणे या स्पर्धेचे पारितोषिक देण्यात आले.विद्यार्थ्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल संस्थेचे संचालक मंडळ, मुख्याध्यापक व सर्व कर्मचार्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




# जिल्ह्यात महिला लैंगिक अत्याचाराचे दोन गुन्हे दाखल

## चांदुर रेल्वे व चांदुर बाजारातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि. 29 )** - जिल्ह्यात महिला लैंगिक अत्याचाराचे दोन गुन्हे 27 मार्च रोजी उघडकीस आले आहे. चांदुररेल्वे व चांदुरबाजार तालुक्यात या घटना घडल्या असून, या घटनांमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

चांदुररेल्वे तालुक्यात मनोरुग्ण तरुणीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना 27 मार्च रोजी उघडकीस आली. या घटनेची तक्रार 40 वर्षीय महिलेने 27 मार्च रोजी चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात दिली. तक्रारीनुसार, मनोरुग्ण तरुणी घरात झोपली होती. दरम्यान तिच्या आईला जाग आल्यानंतर ती घरात दिसली नाही. त्यामुळे त्यांनी मुलीचा शोध घेतला. त्यावेळी आरोपी तरुण हा मुलीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न करताना दिसला. या घटनेची तक्रार महिलेने चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी वासुदेव रामजी राठोड (36, रा. चांदुररेल्वे) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. तसेच चांदुरबाजार तालुक्यात घराशेजारी राहणारी एक तरुण शेजारी राहणार्या व्यक्तीच्या घरी मोबाईल चार्जिंगकरिता गेली होती.

दरम्यान आरोपी अनाडी जुगर राठी (40) याने तरुणीला जबरदस्तीने पकडून तिचे तोंड दाबले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यामुळे ती तरुणी गर्भवती राहिली. ही घटना तरुणीला अमरावती येथील रुग्णालयात दाखल केल्यानंतर उघडकीस आली. याप्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी झिरो डायरी कायमी केली असून, हे प्रकरण चांदुबाजार पोलिसांकडे वर्ग केले आहे.

# अचलपूर-रासेगाव रस्त्याच्या कामाने पकडला वेग

## महासागर च्या वृत्ताचा परिणाम | नागरिकांनी व्यक्त केला आभार




अचलपुर-रासेगाव मार्गावर दुभाजकाचे काम कासवगतीने

अपघातांचा धोका वाढला

महासागर प्रतिनिधी

अचलपूर,( दि.25 )

प्रशासनाकडून हस्तक्षेपाची अपेक्षा

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर( दि.29 )** - काही दिवसांपूर्वी अचलपूर ते रासेगाव मार्ग आणि डिव्हायडरच्या कामाच्या संथ गतीबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली होती. या विषयावर दैनिक महासागर मध्ये बातमी प्रकाशित झाल्यानंतर प्रशासन आणि ठेकेदारांनी तत्काळ दखल घेतली आणि कामाच्या गतीत वाढ केली. आता रस्ता दुरुस्तीचे काम जलद गतीने सुरू असून, नागरिकांनी याबाबत समाधान व्यक्त केले आणि प्रशासनाचे आभार मानले आहेत.

अचलपूर-रासेगाव मार्ग अनेक वर्षांपासून खराब स्थितीत होता. रस्त्यात ठिकठिकाणी मोठे खड्डे, धूळ आणि डिव्हायडरच्या अपूर्ण कामामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता आणि वारंवार अपघात घडत होते. प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रार करूनही कामाची गती अत्यंत मंद होती. मात्र, जेव्हा हा विषय दै.महासागर ने उचलून धरल्यावर प्रशासन आणि ठेकेदारांनी त्वरीत लक्ष घालून रस्त्याच्या कामाला गती दिली.

### मनुष्यबळ वाढविले

बातमी प्रकाशित झाल्यानंतर संबंधित विभागाने ठेकेदाराला रस्त्याच्या दुरुस्तीचे काम त्वरित पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यानंतर मजुरांची संख्या वाढवण्यात आली आणि खोदकाम, समतलीकरण तसेच डिव्हायडर उभारणीची गती वाढवण्यात आली. सध्या रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरणाचे काम वेगाने सुरू आहे.

### अद्याप काही अडचणी कायम

जरी रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाने वेग घेतला असला, तरी काही ठिकाणी अजूनही खड्डे बुजवण्याचे आणि समतलीकरणाचे काम बाकी आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे विनंती केली आहे की, हे काम दर्जेदार पद्धतीने आणि वेळीच पूर्ण करण्यात यावे. वृत्तपत्राच्या माध्यमातून नागरिकांची व्यथा प्रशासनापर्यंत पोहोचली आणि त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. अचलपूर-रासेगाव रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला आता वेग आला असून, लवकरच हा मार्ग प्रवासासाठी अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर होईल.

# पार्वती नगरात अज्ञात तरुणांनी केली कारची तोडफोड

## तलवार आणि चाकूने फोडले टायर



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.29 )**- खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणार्या पार्वती नगर परिसरात गुरुवारी मध्यरात्री तीन अज्ञात तरुणांनी हातात तलवार आणि चाकू घेऊन दहशत निर्माण केली. एलआयसी एजन्टच्या कारची तोडफोड केली. हे तरुण एवढ्यावरही नाही थांबले तर, त्यांनी कारचे टायर चाकुने आणि तलवारने फोडले. दगडफेक करून दहशत निर्माण केली.यासंदर्भात एलआयसी एजंट ऋषिकेश कुलकर्णी यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत परिसरात लागलेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर आरोपींचा शोध सुरू केला आहे. माहितीनुसार पार्वती नगर परिसरात गुरुवारी रात्री तीन युवक हातात तलवार आणि चाकू घेऊन दहशत निर्माण करत होते. त्यांनी परिसरात राहणारे ऋषिकेश कुलकर्णी यांची फोर व्हीलर एमएच 04/एफझेड/4893 ची तोडफोड केली. कारच्या काचा फोडल्या आणि त्याचे टायर तलवार आणि चाकू ने कापले. पश्चात त्यांनी परिसरात दगडफेक केली. यामुळे परिसरात दहशत निर्माण झाली होती. तिन्ही तरुण हातात चाकू आणि तलवार घेऊन परिसरात फिरत होते. हा संपूर्ण घटनाक्रम परिसरामध्ये लागलेल्या सीसीटीव्हीत कैद झाला आहे. शुक्रवारी (दि.28) सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर नागरिकांची बरीच गर्दी कुळकर्णी यांच्या घरासमोर जमा झाली होती. त्यांनी घटनेची तक्रार पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी कलम गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# अमरावती-मुंबई विमानसेवेचा मुहूर्त पुन्हा टळला

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 29)** - अमरावती विमानतळावरून 31 मार्चला प्रवासी विमानसेवा सुरू होणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केली होती. मात्र अद्यापही विमानसेवेचे वेळापत्रक आणि उद्घाटनाची तारीख निश्चित न झाल्याने प्रवासी विमानसेवा सुरू होण्याचा मुहूर्त लांबणीवर पडला आहे. आणखी 20 ते 30 दिवस विमानसेवेच्या उद्घाटनाला लागण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. अमरावती विमानतळावर नवीन धावपट्टी




तयार करण्यात आली आहे. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात आले. येथून एटीआर हे 72 आसनी विमान उडू शकणार आहे. प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजनेअंतर्गत मुंबई-अमरावती-मुंबई मार्गावर 'अलायन्स एअर' या कंपनीच्या माध्यमातून एटीआर 72 आसनी विमान सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. विमानतळ आता प्रवासी वाहतुकीसाठी सज्ज झाले आहे. अमरावती विमानतळाला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) परवाना दिला आहे.

अलायन्स एअरची मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा सुरुवातीला आठवड्यातून तीनदा राहणार आहे. मात्र अद्यापही अलायन्स एअरलाइन्सने अद्यापही वेळापत्रक घोषित केलेले नाही. दरम्यान, विमानतळाच्या परिसरात उद्घाटन समारंभाची तयारी सुरू आहे. लवकरच उद्घाटनाची तारीख घोषित होऊ शकते, मात्र 31 मार्चचा मुहूर्त टळला असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता विमानसेवेच्या वेळापत्रकाची प्रतीक्षा आहे. 'अलायन्स एअर'च्या संकेतस्थळावर विमातळांच्या यादीत अमरावती हे नाव झळकत असले, तरी वेळापत्रक मात्र अद्याप घोषित झाले नाही. त्यामुळे विमानसेवेच्या पुढील अधिकृत उद्घाटनाच्या तारखेची प्रतिक्षा अमरावतीकरांना आहे.

# कौंडण्यपूरच्या अंबिका मंदिरात आजपासून रामनवमी महोत्सव

## 6 एप्रिलपर्यंत श्रीराम कथा प्रवचन

**महासागर प्रतिनिधी**

**कुऱ्हा, (दि.29)** - विदर्भाची पंढरी असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे आई रुक्मिणी हरण मंदिर श्री अंबिका देवी संस्थान येथे चैत्र रामनवमी देवी नवरात्र महोत्सवाला आजपासून प्रारंभ होत आहे. या महोत्सवाअंतर्गत मंदिरात 30 मार्च ते 6 एप्रिल य कालावधीत अनेक कार्यक्रम कायजित करण्यात आले आहे.

महोत्सवादरम्यान मनोकामना सिद्धी निमित्य अखंड दीपज्योत व श्रीराम कथा प्रवचन ज्ञानयज्ञ होणार आहे. त्याची सुरुवात यजमान आर्वी येथील सामाजिक कार्यकर्ते दानशूर रमेशचंद्र राठी यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलन करुन होईल. श्रीराम कथा निरुपन अमरावती येथील प्रवचनकार हभप सुधाकर महाराज ठाकरे आणि संच करणार आहेत. 30 मार्चला सकाळी 8वाजता श्रींची पूजा, अभिषेक होणार असून यजमान विश्वस्त मंडळ कौंडण्यपूर व श्री. व सौ. गिरीधर अग्रवाल (आर्वी) यांचे हस्ते घटस्थापना करण्यात येईल. यजमान विश्वस्त मंडळ दीपज्योती प्रज्वलन यजमान रमेशचंद्र राठी श्री. व सौ. भैय्यासाहेब ठाकरे श्री. व सौ. रमेशभाऊ सोनी (आर्वी) यांचे हस्ते करण्यात येईल. तसेच चैत्र



रामनवमी देवी नवरात्र महोत्सवामध्ये दैनंदिन कार्यक्रमात सकाळी 6 ते 7 देवी सहस्त्रनाम, सकाळी 7 ते 8 महापूजा, सकाळी 8.30 वाजता महापूजा, आरती, सकाळी 9 ते दुपारी 12 दुर्गा शप्तशतीपाठ, दुपारी 12 ते 12.30 धूप आरती व नैवेद्य, सायंकाळी 7 ते 7.30 आरती सार, रात्री 8 ते 9 विष्णू सहस्त्रनाम व हरिपाठ, रात्री 9 वाजता दररोज विविध भजन मंडळाद्वारे भजनाचा कार्यक्रम होणार आहे. देऊरवाडा, आर्वी, कौंडण्यपूर, अहिरवाडा, मिर्चापूर, सर्कसपुर येथील वारकरी भजन, महिला मंडळ यांचा सहभाग राहणार आहे. 5 एप्रिलला रात्री होम हवन, 6 एप्रिलला पूर्णाहूती, दुपारी 12 ते 3 पर्यंत महाप्रसाद वितरित करण्यात येईल. भाविक भक्तांनी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विश्वस्त व पुजारी यांनी केले आहे.

# पीडीएमसीत 1 ते 13 एप्रिल दरम्यान दररोज रक्तदान शिबीर

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजन

## महाविद्यालयाच्या साहित्य समुहाचा उपक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 29)** - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे वैद्यकीय विद्यार्थ्यांकडुन चालविण्यात येणा ?या 'अभिव्यक्ती : द टाइमलेस टेल्स' या साहित्य समुहातर्फे 1 एप्रिल ते 13 एप्रिल दरम्यान दररोज सकाळी 9 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत रक्तदान शिबीराचे आयोजन डॉ. पंजाबराव देशमुख रक्तपेढी, पीडीएमएमसी येथे करण्यात आले आहे. रक्तदानाबाबत जागरूकता वाढवणे आणि गरजू रूग्णांसाठी जीवनदायी रक्ताचा पुरवठा करणे हे या



शिबिराचे मुख्य उदिष्ट आहे. तसेच महामानवाला श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी हा उपक्रम मानवीय दृष्टीकोनातून राबविण्यात येत आहे. या समाजपयोगी कार्यात सहभागी होण्याचे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्निल मोहोड यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता 9137377548/ 9325794647/ 7030387576 / 9284076785 या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# राजुरा बाजार येथे आज रुग्णवाहिकेचे लोकार्पण

## यशवंत गोसावींच्या व्याखानाचेही आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**राजुरा बाजार,(दि.29)** - राजुरा बाजार येथील शिवशक्ती देवस्थान मित्र परिवाराने परिसरात रुग्णांच्या सुविधेसाठी रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिली असून त्याचे लोकार्पण गुढीपाडव्याच्या शुभ मूहूर्तावर रविवार, 30 मार्च रोजी होत आहे. या लोकार्पण समारंभाच्या निमित्ताने पुणे येथील प्रसिद्ध व्याख्याते प्रा. यशवंत गोसावी यांच्या व्याखानाचेही आयोजन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

राजुरा बाजार येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात हा कार्यक्रम पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार देवेंद्र भुयार हे राहतील. रुग्णवाहिकेचे लोकार्पण अमरानंद महाराज, हभप रमेश महाराज मानकर आणि सिद्धेश्वर साबळे यांचया हस्ते होणार आहे.




यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, खा. अमर काळे, खा.डॉ अनिल बोंडे, आ. उमेश यावलकर, सरपंच नीलेश धुर्वे आदी उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवशक्ती देवस्थान मित्र परिवाराने केले आहे.

# अमरावतीत तीन दिवसांत तिघांचे नेत्रदान

## कुटुंबांकडून सामाजिक बांधीलकीची जोपासना | दिशा नेत्रपेढीत पार पडली प्रक्रिया

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 29)** - आपल्या कुटुंबातील सदस्याच्या निधनाचे दुःख बाजूला शहरातल्या तीन कुटुंबांनी निधन झालेल्या आपल्या परिवारजनाचे नेत्रदान करुन सामाजिक बांधीलकीच्या भावनेचा परिचय दिला. या मानवीय कार्यामुळे समाजातील तीन अंध बांधवांना जग पाहता येणार आहे. या तीन परिवारांनी नेत्रदानाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या दिशा इंटरनॅशनल आय बँकमध्ये आपल्या परिजनांचे नेत्रकमल दान करण्याची प्रक्रिया पूर्ण केली.



स्व. श्रीमती कुसुमाबाई दवे | स्व. श्री. यतींद्र पैठणे | स्व. श्री. विनायक फंदे

विनायक नीलकंठ फंदे (वय 54 वर्षे), श्रीमती कुसुमबाई माणिकराव दवे (वय 77 वर्षे) व यतींद्र पंढरीनाथ पैठणे (वय 80 वर्षे) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. कुटूंबातील व्यक्तीच्या निधनामुळे कुटूंबियांना दुःख होणे स्वाभाविक होते. परंतु त्याही परिस्थितीत गरजूंना जग पाहता यावे, या उद्दात भावनेने दवे परिवार, पैठणे परिवार व फंदे परिवाराच्या सदस्यांनी निधन झालेल्या आपल्या परिवारातील सदस्याचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी अमरावती मधील दिशा एजुकेशन फाऊंडेशनद्वारा संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीला संपर्क केला.

दिशा ग्रुपचे सचिव स्वप्निल अरुण गावंडे, दिशा आय बँकेचे मेडिकल डायरेक्टर डॉ. मनिष बबन तोटे, हिमांशू बंड, अनिल देशमुख यांनी मरनोत्तर नेत्रकमळ दान करून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली. नेत्रदानाचे पवित्र कार्य केल्याबद्दल दिशा एजुकेशन फाऊंडेशन व दिशा इंटरनॅशनल आय बँकच्या अध्यक्षा कुंदा गावंडे व सचिव स्वप्निल गावंडे यांनी फंदे, दवे व पैठणे कुटुंबियांचे आभार मानले. तिन्ही परीवाला मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंतर्गत नेत्रदानाचे प्रमाणपत्र देण्यात आले. या सेवाभावी कार्यात फंदे परिवाराचे अक्षय फंदे, निलेश कळंबे, चेतन नवले, दवे परिवारातील प्रज्वल दवे, कु. गौरी दवे, राहुल अंबुलकर व पैठणे परिवारातील ययाती पैठणे, निखिल तिवस्कर, नंदकुमार देव यांच्यासह इतर सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी स्व. श्रीमती कुसुमबाई माणिकराव दवे, स्व. श्री. यतींद्र पंढरीनाथ पैठणे व स्व. श्री. विनायक नीलकंठ फंदे यांना श्रद्धांजली अर्पित करणात आली.

देशात अंधत्वाची एक मोठी समस्या आहे. एका व्यक्तीच्या नेत्रदानामुळे दोन कोर्नेअल अंधांना दृष्टी प्राप्त होऊ शकते. मृत्यूनंतर नेत्रदानासाठी काही काळजी घेणे गरजेचे आहे. जसे मृत्यूनंतर सहा तासांपर्यंत नेत्रदान केले जाऊ शकते. त्यामुळे मृत्यूनंतर ताबडतोब दिशा इंटरनॅशनल आय बँकेला संपर्क करावा, मृत व्यक्तीचे डोळे उघडे असल्यास ते बंद करावे व त्यावर ओले कापसाचे बोळे ठेवावे. मृत व्यक्तीच्या डोक्याखाली 2 उश्या ठेवाव्या पंखा बंद ठेवावा, एसी असेल तर सुरु ठेऊ शकता. अशी काळजी घेणे गरजेचे असल्याचे दिशा संस्थेने कळविले आहे. मरनोत्तर नेत्रदानासाठी दिशा इंटरनॅशनल आय बँक, रसिक बिल्डिंग, आयकर ऑफिस मागे, अंबापेठ, अमरावती. मो. 9899898667, 8275539754, 7378656145 किवा स्वप्नील अरुण गावंडे - 9423424450. यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# बारावीपर्यत मराठी विषय अनिवार्य करा

- मराठी विषय महासंघाची मागणी
- जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड, (दि. 29)** - मराठी विषय इयत्ता बारावी पर्यंत सक्तीचा करण्याचा शासन निर्णय 13 सप्टेंबर 2024 रोजी पारीत झाला. या आदेशाची अंमलबजावणी शासनाने येत्या शैक्षणिक वर्षापासून (2025-26) करावी अशी मागणी अमरावती जिल्हा मराठी महासंघाने केली आहे. यासंदर्भात जिल्हाध्यक्ष प्रा. ओमप्रकाश ढोरे यांच्या नेतृत्वाखाली निवासी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

मराठी विषय हा सर्व विद्याशाखांमध्ये अनिवार्य करावा, या शासकिय आदेशाची अद्याप अंमालबजावनी करण्यात आलेली नाही. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मराठी भाषा प्रत्येक वर्गात शिकविणे बंधनकारक होणे आवश्यक आहे. त्यामुळे शासकीय आदेशांचे पालन करुन या सत्रापासून बारावीपर्यंत प्रत्येक वर्गात मराठी भाषा शिकविणे अनिवार्य करावे, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली. जिल्हाधिका ?यांमार्फत हे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, तसेच भाषा व उद्योग मंत्री उदय सामंत यांना पाठविण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांना निवेदन देतांना मराठी विषय शिक्षक महासंघाचे सचिव प्रा. सुभाष पारीसे, कार्याध्यक्षा प्रा. डॉ. दिपाली सांगोले, उपाध्यक्ष प्रा. अरुण मेश्राम, प्रा. डॉ. राजेंद्र राऊत, प्रा. रमेश खाडे, प्रा. अशोक डहाके तसेच तालुका प्रतिनिधी प्रा. ज्योती शेंडे (दर्यापूर), प्रा. योगिता देशमुख (अमरावती), प्रा. योगेश सुने (चांदूर बाजार), प्रा.राजेश चव्हाण(धारणी),प्रा.दिलीप जावळे (मोर्शी), प्रा. स्वाती वसू, प्रा. सारीका फरतोडे, प्रा. तृप्ती देशमुख, प्रा. प्रीती डवरे, प्रा. प्रमोद मेंढे, प्रा. पवन ढवळे, प्रा. अमोल डवरे आदी उपस्थित होते.

# जिवंत सातबारा मोहीम महसूल विभागाची पारदर्शकता वाढविणारी

## महसूल मंत्री बावणकुळे यांची माहिती



### वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करणार ?

1 ते 5 एप्रिलपर्यंत प्रत्येक गावातील तलाठी मृत खातेदारांची यादी तयार करून मोहिमेद्वारे ही प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. राज्य शासनाने 19 मार्च रोजी यासंदर्भात निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात ही मोहीम 1 एप्रिलपासून राबविण्याचा आदेश दिला असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

### अशी असणार मोहीम

महसूल विभागाकडून स्वत:हून वारसांची नोंद करण्यात येईल. अर्जदाराने अर्ज न करता महसूल यंत्रणा पुढाकार घेईल. मृत व्यक्तींची नावे सात-बारावरून कमी करून वारसांची नोंद केली जाईल. ही संपूर्ण प्रक्रिया फक्त दीड महिन्याच्या कालावधीत पूर्ण केली जाणार आहे.

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.29)** - कुटुंबातील एखाद्याचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना शेतजमीन, मालमत्ता आपल्या नावावर करताना अनेकवेळा अडचण येते. आता मात्र मृत खातेदारांच्या वारसांना शेतजमिनीशी संबंधित अधिकार सहजआणि वेगाने मिळावेत, यासाठी राज्य शासनाकडून जिवंत सातबारा मोहीम राबविली जाणार आहे. यामध्ये मृत खातेदारांची नावे कमी करून त्यांच्या वारसांची नावे सातबारावर त्वरित नोंद करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि. 28) पत्रकार परिषदेत बोलतांना दिली.

राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून 100 दिवस कृती कार्यक्रमांतर्गत, ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत, सातबारा उताऱ्यावर मृत खातेदारांच्या वारसांची अधिकृत नोंदणी केली, जाणार आहे. जिवंत सातबारा मोहीम महसूल विभागाची पारदर्शकता वाढविणारी ठरणार आहे. त्यामुळे कायद्याच्या चौकटीत राहून त्वरित निर्णय घेता येणार आहे. परिणामी वेळ आणि पैशाची बचत होणार आहे. महसूल विभागाकडून स्वत:हून वारसांची नोंद करण्यात येईल. अर्जदाराने अर्ज न करता महसूल यंत्रणा पुढाकार घेणार आहे. मृत व्यक्तींची नावे सातबारावरून कमी करून वारसांची नोंद करण्यात येणार आहे. तहसीलदारांची समन्वय अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाणार असल्याचेही बावनकुळे म्हणालेत. तर अमरावती जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था, जलसंधारण, पा द ण रस्ते, पावसाळ्यात उद्भवणारी पूर परिस्थिती यावर आपण उपाय योजना करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र महापालिकेचे आयुक्त सचिन कलंत्री, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी अमरावती जिल्ह्याचा 100 दिवस कृती कार्यक्रमांतर्गत सविस्तर माहिती दिली. यावेळी आ. प्रताप अडसड, आ.केवलराम काळे, आ. प्रवीण तायडे, प्रवीण पोटे पाटील उपस्थित होते.

# मासोद ते मार्डी रस्त्याचे काम तत्काळ पूर्ण करा!

## अन्यथा आंदोलन, गिरीष चौधरींचा इशारा

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, (दि. 29)** अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या मासोद ते मार्डी या ग्रामीण मार्ग क्रमांक 8 च्या खडीकरण व डांबरीकरणाचे काम सुरु असून हे काम अत्यंत संथ गतीने करण्यात येत आहे. त्यामुळे या कामाचा वाहनचालक आणि नागरिकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत आहे. या रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गिरीश चौधरी यांनी केली आहे. अन्यथा 3 दिवसीय



अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी लि आहे.

मासोद ते मार्डी रस्त्याच्या कामाचे कंत्राट मे. एस. व्ही. उगले, अमरावती यांना मिळाले आहे. सदर कामामध्ये रस्त्यावर सहा रपटे पूर्ण करण्यात आले आहे व खडीकरणाचे काम सुरू करण्यात आले. तसेच डांबरीकरणाचे काम 31 मार्चपर्यंत पूर्ण करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. तेव्हा गिरीश चौधरी यांनी आपले आंदोलन मागे घेतले होते. पण गेल्या तीन महिन्यांपासून अजूनही या रस्त्याचे काम सुरू झाले नसल्याने, नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मासोद ते श्री. संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल व मार्डी हा रस्ता दोन वर्षापासून दुर्दशाग्रस्त झाला आहे. रस्त्यावर मोठाले खड्डे पडले असून ठिकठिकाणी रस्ता उखडला आहे.

त्यामुळे अपघात घडून अनेकदा शाळकरी विद्यार्थी, महिला, पुरुष जखमी झाल्याच्या घटना घडल्या. पावसाळ्यात तर हा रस्ता बंद असल्यामुळे सर्वांना 6 किलोमीटरचा फेरा घेऊन जावे लागते. हार्ट हॉस्पिटल, शाळा, मेडिकल कॉलेज, इथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोज त्रास होतो. या रस्त्यावर कोणी मृत्युमुखी पडले तर याला सर्वस्वी शासन, कॉन्ट्रॅक्टर, बडनेरा मतदार संघाचे आमदार, ग्रामपंचायत जबाबदार राहिलं असे गिरीष हरिश्चंद्र चौधरी यांचे म्हणणे आहे.

रस्त्याचे काम गतीने पूर्ण करण्यासाठी 15 जानेवारी व 10 फेब्रुवारी रोजी चौधरी यांनी निवेदन देवूनही सार्वजनिक बांधकाम विभाग त्याकडे दुर्लक्ष करुन जनतेची फसवणूक करीत असल्याचा आरोप त्यांनी केला असून हे काम तात्काळ पूर्ण करण्याची मागणी केली आहे. कंत्राटदार कामात दिरंगाई करित असताना आमदार आणि प्रशासनाकडून त्यांना पाठीशी घातले जात असल्याचेही चौधरी यांचे म्हणणे आहे. याबाबत दखल घेतली गेली नाही तर 14 एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपासून उपोषण सुरू करण्याचा इशारा गिरीश चौधरी यांनी दिला आहे.

# नांदगाव खंडेश्वर येथे अवैध सावकाराच्या घरी धाड

## आवश्यक 44 दस्तऐवज जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.29)** - जिल्हा सहकारी संस्था उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या आदेशाने जिल्ह्यातील परवाना धारक सावकारांच्या सावकारी व्यवहाराच्या कागदपत्रांची तपासणी करून अहवाल तयार केल्या जात आहे. त्या अनुषंगाने नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील परवानाधारक सावकार लक्ष्मी ज्वेलर्स आर्टचे मंगेश मधुकरराव डिभे यांचे घरी (दि.28)धाड टाकण्यात आली. यादरम्यान त्यांनी वर्ष 2023 ते 2025 या कालावधी मध्ये सावकारी परवण्याचे नूतनीकरणच केले नसल्याचे दिसून आले. वास्तविक मंगेश डीभे यांना परवाना नूतनीकरण करण्या संदर्भात पोस्टाने नोटीस देण्यात आली होती.सावकार मंगेश डिभे यांना नोटीस मिळाल्यानंतरही परवाना नूतनीकरण संदर्भात कुठलीच हालचाल केली नाही. त्यामुळे त्यांच्या गजानन लक्ष्मी ज्वेलर्स आर्ट येथे तपासणी करण्यात आली. परवानाधारक सावकाराने दुकान विक्री करून बाहेर गावी निघून जाण्याची तयारी केली होती. ही माहिती प्राप्त होताच सहायक निबंधक यांनी तपासणी पथक मंगेश डिभे यांच्या घरी



पाठवले. आणि त्यांच्या घराची झडती घेतली.सहायक निबंधक सचिन पतंगे, सुधीर मानकर, आशिष भोंडे, चेतना कुचे, ज्ञानेश्वर हेडाऊ, अभय महाजन, किशोर आढाव, जया मोरकर यांच्या टीमने मंगेश डिभे यांच्या राहते घरी श्री संत जगनाडे नगर येथे धाड टाकली. जवळपास 5 तास कारवाई करण्यात आली.डिभे यांच्या घरून सावकारी व्यवहारासंबंधी एकूण 44 दस्तावेज आढळून आले. त्या मध्ये गहाण ठेव पावती बुक, गहाण सोड पावती बुक,नोंदवही, दुकानाच्या नावाची धनादेश, बँक पासबुक, सोने-चांदी विक्रीचे पावती बुक, खतावणी नोंदवही, भांडवल खाते नोंदवही तपासणी आदि पथकाने जप्त केले. महाराष्ट्र सावकारी अधिनियम मधील तरतुदी नुसार परवानाधारक सावकार मंगेश डिभे यांना पुन्हा नोटीस देण्यात आली आणि त्यांचा परवाना रद्द करण्यासंदर्भात कारवाई सुरू करण्यात आली आहे.